# प्रेसनोट

दि.०७.०६.२०१९

**शिर्षक -** तक्रारदार यांचे निलंबन कालावधीतील निर्वाह भत्याचे बील मंजूर करण्यासाठी ५००/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारणारे श्री. संतोष सावळे, लिपीक, कोषागार कार्यालय, सोलापूर व श्री.लक्ष्मण भांगरे, सहा.फौ.सोलापूर ग्रामीण यांना रंगेहात पकडले.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परीक्षेत्र, सोलापूर युनिट. |
| गुन्हा नोंद क्रमांक | सदर बझार पोलीस स्टेशन, सोलापूर शहर, गुरनं /२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७,१२ प्रमाणे. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) संतोष शिवाजी सावळे, वय ४३ वर्षे, पद लेखा लिपीक, जिल्हा कोषागार कार्यालय, सोलापूर.<br>२) लक्ष्मण नागू भांगरे, वय ५२ वर्षे, सहायक फौजदार, नेमणूक पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५००/- रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण आस्थापनेवर पोलीस कॉन्स्टेबल म्हणून नोकरीस असून ते दि.२०.११.२०१८ ते दि.२७.०४.२०१९ या कालावधीत निलंबीत होते. सदर निलंबन कालावधीतील निर्वाह भत्याचे बील मंजूरीसाठी पोलीस अधिक्षक,सोलापूर ग्रामीण कार्यालयाकडून जिल्हा कोषागार कार्यालयाकडे पाठवले होते. सदरचे बील हे मंजूर करून निर्वाह भत्याची रक्कम जमा करण्यासाठी सहा.फौ.भांगरे यांच्या मार्फतीने कोषागार कार्यालयातील लिपीक श्री. सावळे हे ५००/- रूपये लाचेची मागणी हे करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर कडे तक्रार नोंदवली होती.<br>त्यावरून सदर तक्रारीची दि.०७.०६.२०१९ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर कडून पडताळणी करण्यात आली होती. त्यामध्ये तक्रारदार यांनी प्रथम पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण येथे जावून सहा.फौ. भांगरे यांची भेट घेतली असता त्यांनी सावळे यांच्याकरीता ५००/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांनी श्री.सावळे यांची भेट घेतली असता त्यांनी देखील ५००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर यातील श्री.सावळे व श्री.भांगरे यांच्या विरूध्द लाचेचा सापळा लावण्यात आला. त्यामध्ये तक्रारदार यांचेकडून श्री.सावळे यांनी लाच रक्कम ५००/- रूपये स्विकारल्यानंतर रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | पोलीस उपअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, रंगभवन चौक, सोलापूर ४१३४०३. |
| संकेत स्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | acbwebmail@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार अॅप | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२१७-२३१२६६८ |
| व्हॉटसअॅप क्रमांक | :- | ९९३०९९७७०० |

सहा. पो. आयुक्त/पोलीस उप अधिक्षक, सोलापूर

(अरूण देवकर)
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो. सोलापूर.